भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

**आरबीआय/२०११-१२/२९**
**डीएनबीएस(पीडी)सीसी क्र. २३५/०३.१०.००१/२०११-१२** **जुलै १, २०११**

प्रति
सर्व अबँकीय वित्तीय कंपन्या (एनबीएफसी)

महोदय,

**महापरिपत्रके - एनबीएफसी - एनडी - एसआय ह्यांना संकीर्ण सूचना**

ह्या विषयावरील सर्व सूचना एकाच जागी मिळाव्यात ह्यासाठी, रिझर्व बँकेने जून ३०, २०११ रोजी संपलेल्या वर्षामध्ये दिलेल्या सर्व सूचना एकत्रित केल्या आहेत. ह्या परिपत्रकार, प्रुडेंशियल नॉर्म्सवरील महा अधिसूचना व महापरिपत्रक - कॉंपेडियम ऑफ इंस्ट्रक्शन्स टु एनबीएफसी मध्ये एकत्रित केलेल्या सूचना सोडून, एनबीएफसी-एनडी-एसआय ह्यांना खास दिलेल्या सूचना एकत्रित करण्यात आल्या आहेत. निरनिराळ्या विषयांखाली दिल्या गेलेल्या सर्व सूचनांची यादी संदर्भासाठी एकत्रित करण्यात आल्या आहेत. सर्व परिपत्रके, आरबीआयच्या वेबसाईटवर (http://www.rbi.org.in) टाकण्यात आल्या आहेत. ह्या कॉंपेडियमची एक प्रत सोबत जोडण्यात आली आहे.

आपली

(उमा सुब्रह्मण्यम्)
प्रभारी मुख्य महाव्यवस्थापक

## १. सिस्टिमॅटिकली इंपॉर्टंट एनबीएफसी व बँकां ह्यांचे वित्तीय विनियमन व त्यांच्या बरोबरचा संबंध

वित्तीय क्षेत्रातील कामकाजामधील सुरळीतपणा, विनियामक केंद्रीकरण आणि विनियामक मध्यस्थी ह्यासंबंधी प्रश्नांचे परीक्षण करण्यासाठी रिझर्व बँकेने एक अंतर्गत गट स्थापन केला होता. ह्या गटाने केलेल्या शिफारशी व मिळालेला फीडबॅक ह्यावर आधारित, डिसेंबर १२, २००६ रोजी अंतिम मार्गदर्शक तत्वे अंमलबजावणीसाठी देण्यात आली होती.

### विनियामक साचातील बदल

बँका व एनबीएफसी ह्यांच्या कार्यवाहीमधील निरनिराळ्या पैलूंच्या विनियामक गरजांमधून निर्माण होणाऱ्या प्रश्नांचा विचार करता आणि प्रायोजित सुधारणां मागे असलेली तत्वे नजरेसमोर ठेवून एनबीएफसींच्या विनियामक साचामध्ये पुढील बदल करण्यात आले.

### अ. सिस्टिमॅटिकली इंपॉर्टंट एनबीएफसी -एनडी (एनबीएफसी - एनडी -एसआय)

### १) एनबीएफसी - एनडी - एसआय असल्याचे ठरविणे.

शेवटच्या ऑडिटेड ताळेबंदानुसार, रु १०० कोटी किंवा त्यापेक्षा अधिक ॲसेट साईज असलेल्या सर्व एनबीएफसी -एनडींना सिस्टिमॅटिकली इंपॉर्टंट एनबीएफसी - एनडी (एनबीएफसी -एनडी - एसआय) समजले जाईल.

### २) एनबीएफसी - एनडी - एसआयसाठी कॅपिटल ॲडेक्वसी रेशो.

एनबीएफसी -एनडी - एसआय, किमान १०% एवढा कॅपिटल टु रिस्क - वेटेड ॲसेट्स रेशो (सीआरएआर) ठेवतील. हा रेशो, मार्च ३१, २०१० रोजी १२% करण्यात आला व मार्च ३१, २०११ रोजी १५% करण्यात आला[१]. एनबीएफसी - एनडीसाठी, जसे असेल त्यानुसार सध्याचा किमान सीआरएआर १२% किंवा १५% असणे सुरुच राहील.

### ३) एनबीएफसी - एनडी - एसआयसाठी सिंगल/ग्रुप एक्सपोझर नॉर्म्स

ह्याशिवाय, केवळ एकमेव संस्था/गटासाठी असलेल्या जोखमींबाबत (एक्सपोझर्स) एक धोरण ठेवण्यास एनबीएफसी - एनडी - एसआयना सांगण्यात आले होते. प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे सार्वजनिक निधी न मिळविणाऱ्या एनबीएफसी - एनडी - एसआय, ह्या जोखीम-मर्यादांच्या तत्वानुरुप सुयोग्य अशा वाटपासाठी रिझर्व बँकेकडे अर्ज करु शकतात.

### ब. ॲसेट फायनान्स कंपन्यासाठी अतिरिक्त सिंगल एक्सपोझर नॉर्म्स

**४)** परिपत्रक डीएनबीएस.पीडी.सीसी.क्र. ८५/०३.०२.०८९/२००६-०७ दि. डिसेंबर ६, २००६ अन्वये, उत्पादक/आर्थिक कार्यकृतींसाठी प्रत्यक्ष/खऱ्या ॲसेट्सना वित्तसहाय्य करणाऱ्या कंपन्यांचे वर्गीकरण, त्यात दिलेल्या निकषानुसार, ॲसेट फायनान्स कंपन्या (एएफसी) असे केले जाईल.

[१] सीसी १३८ दि. एप्रिल २४, २००९ व अधिसूचना क्र. २०६ दि. मे २६, २००९ अन्वये सुधारित.

एनबीएफसी - डी व एनबीएफसी - एनडी - एसआयसाठी विहित केलेल्या, सिंगल पार्टी व सिंगल ग्रुप ऑफ पार्टीज् एक्सपोझर नॉर्म्सच्या व्यतिरिक्त, अपवादात्मक परिस्थितीमध्ये, एएफसींना, सिंगल पार्टी व सिंगल ग्रुप ऑफ पार्टीज्साठीचे एक्सपोझर, त्यांच्या निज-निधीच्या ५ टक्केपर्यंत अधिक वाढविण्यास परवानगी आहे.

## क. स्वयंचलित मार्गाद्वारे एनबीएफसींच्या कार्यकृती विस्तार

**५)** स्वयंचलित मार्गाखाली स्थापन झालेल्या एनबीएफसींना, त्या स्वयंचलित मार्गाखालीच परवानगी असलेल्या केवळ १८ कार्यकृती[2] करण्यास परवानगी आहे. ह्या व्यतिरिक्त अन्य कार्यकृती करण्यासाठी एफआयपीबीची पूर्वमंजुरी घ्यावी लागेल. त्याप्रमाणे, एफडीआय धोरणाखाली परवानगी असलेल्या क्षेत्रात (सोफ्टवेअर) प्रवेश केलेली व नंतर एनबीएफसी क्षेत्रात कार्यकृती करु इच्छित असलेल्या कंपनीलाही किमान भांडवलीकरण निकष व इतर विनियमांचे अनुपालन करणे आवश्यक आहे.

## जारी असलेली तारीख व संक्रमण

सुधारित विनियामक साचाच्या काही तत्वांचे अनुपालन काही एनबीएफसींद्वारे केले गेले नसल्याची शक्यता विचारात घेऊन मार्च २००७ अखेरपर्यंतचा संक्रमण काल ठरविण्यात आला. त्यानुसार, एप्रिल १, २००७ पासून, सुधारित साचाच्या सर्व तत्वांचे अनुपालन एनबीएफसींद्वारे केले जावे. एखाद्या एनबीएफसी - एनडी - एसआयला अनुपालन करण्यासाठी अधिक वेळ पाहिजे असल्यास, वरील काळात अनुपालन करणे तिला शक्य का नाही ह्याची कारणे आणि संबंधित बाबींचे अनुपालन करण्यासाठी तिला पाहिजे असलेला कालावधी स्पष्टपणे निर्देशित करुन तिने जानेवारी ३१, २००७ रोजी व्यवहार बंद होण्यापूर्वी डीएनबीएसकडे अर्ज करणे आवश्यक होते.

## काही विशिष्ट वर्गांसाठी लागु होण्याबाबतची व्याप्ति.

ह्या परिपत्रकात दिलेली मार्गदर्शक तत्वे, खाली दिलेले वर्ग सोडून, संबंधित परिच्छेदात विहित केलेल्या एनबीएफसींना लागु आहेत :

१) अवशिष्ट अबँकीय कंपन्या (आरएनबीसी) व प्राथमिक डीलर्स (पीडी) - कारण त्यांना वेगळे विनियम लागु होतात.

२) कंपनीज् अधिनियमाच्या कलम ६१७ खाली व्याख्या केलेल्या सरकारी मालकीच्या, व रिझर्व बँकेकडे एनबीएफसी म्हणून पंजीकृत झालेल्या कंपन्यांना, नॉन-बँकिंग फायनान्शियल कंपनीज् प्रुडेंशियल नॉर्म्स (रिझर्व बँक) निदेश, १९९८ च्या काही तरतुदींबाबत सध्या सूट दिलेली आहे. ठेवी स्वीकारणाऱ्या व सिस्टिमॅटिकली इंपॉर्टंट सरकारी मालकीच्या सर्व कंपन्यांना ह्या निदेशांखाली आणण्याचे प्रायोजित करण्यात येत आहे. आणि तसे करणे, ह्या परिपत्रकातील मार्गदर्शक तत्वासह विद्यमान तत्वांना धरुन असेल. तथापि, ह्या विनियामक साचाबरोबर संपूर्णपणे अनुपालन केले जाण्याची तारीख नंतर ठरविली जाईल. त्यामुळे ह्या कंपन्यांनी एनबीएफसी विनियमांच्या निरनिराळ्या घटकांचे अनुपालन करण्यासाठी सरकारशी सल्लामसलत करुन एक आराखडा तयार करुन तो रिझर्व बँकेकडे (अबँकीय पर्यवेक्षण विभाग (डीएनबीएस)) मार्च ३१, २००७ पर्यंत पाठवावा.[3]

[2] मार्च १२, २००८ च्या प्रेस रिलीजद्वारे बदलण्यात आला
[3] अधिक माहितीसाठी कृपया डीएनबीएस.पीडी/सीसी.क्र. ८६/०३.०२.०८९/२००६-०७ दि. डिसेंबर १२, २००६ चा संदर्भ घ्यावा

## २. ठेवी न घेणाऱ्या/धारण करणाऱ्या सिस्टिमॅटिकली इंपॉर्टंट एनबीएफसी (एनबीएफसी - एनडी - एसआय)साठी पर्यवेक्षणीय साचा

सिस्टिमॅटिकली इंपॉर्टंट एनबीएफसी - एनडीसाठी असलेल्या विनियामक साचाचे अनुपालन होत असल्याची खात्री करुन घेण्यासाठी अशा कंपन्यांना सांगण्यात आले आहे की, त्यांनी भांडवली निधी, रिस्क-ॲसेट रेशो इत्यादिबाबतचा वार्षिक अहवाल, दरसाल मार्च अखेरीस, विहित नमुन्यात, एनबीएस-७ फॉर्ममध्ये पाठविण्यासाठी एक प्रणाली तयार करावी. असा प्रथम अहवाल मार्च ३१, २००७ रोजी संपलेल्या वर्षासाठी सादर करावयाचा होता, असा अहवाल दर वर्षी वित्तीय वर्ष संपल्याच्या तीन महिन्यांच्या आत सादर केला जावा.
असे अहवाल इलेक्ट्रॉनिक पध्दतीने सादर करावयाचे असून त्याबाबत, तो अहवाल वेब एनेबल्ड सादर करण्यासाठी युजर-आयडी व पासवर्ड मिळविण्यासाठी ह्या विभागाच्या केंद्रीय कार्यालयाच्या इन्फर्मेशन विभागाकडे जावे. ती कंपनी, डिपार्टमेंट ऑफ नॉन बँकिंग सुपरव्हिजनच्या ज्याच्या अधिकारक्षेत्राखाली येते त्या प्रादेशिक कार्यालयाकडे ह्या अहवालाची हार्ड कॉपी नेमलेल्या प्राधिकरणाची सही घेऊन पाठविली जावी[४].

## ३. कॅपिटल ॲडेक्वसी, लिक्विडिटी व डिसक्लोजर नॉर्म्स संबंधाने एनबीएफसी - एनडी - एसआयसाठी मार्गदर्शक तत्वे.

एप्रिल २००७ पासून विनियामक साचाबाबत आलेल्या अनुभवांचा आढावा घेता, कॅपिटल ॲडेक्वसीची आवश्यकता वाढविणे आणि लिक्विडिटी मॅनेजमेंट व रिपोर्टिंग करणे तसेच डिसक्लोजर्सचे नॉर्म्स ह्याबाबतची मार्गदर्शक तत्वे तयार करणे आवश्यक असल्याचे दिसून आले. त्यानुसार ह्या बँकेने वरील बाबींसंबंधाने जनतेचे विचार जाणून घेण्यासाठी तिच्या वेबसाईटवर जून २, २००८ रोजी एनबीएफसी - एनडी - एसआयसाठी प्रारुप मार्गदर्शक तत्वे प्रदर्शित केली. ह्या मार्गदर्शक तत्वांना अंतिम ठरविण्यात येऊन ती अबँकीय वित्तीय (ठेवी न स्वीकारणाऱ्या व धारण न करणाऱ्या) कंपन्या प्रुडेंशियल नॉर्म्स (रिझर्व बँक) निदेश, २००७ म्हणून देण्यात आली[५].

### १) कॅपिटल ॲडेक्वसी

एनबीएफसी - एनडी - एसआयसाठी असलेली कॅपिटल ॲडेक्वसी मार्च ३१, २०१० रोजी १२% व मार्च ३१, २०११ रोजी १५% करण्यात आली[६]

### २) ताळेबंदातील प्रकटीकरण

एनबीएफसी - एनडी - एसआयच्या बाबतीत डिसक्लोजर नॉर्म्सचे पुनरावलोकन करण्यात आले असून असे ठरविण्यात आले आहे की, अशा सिस्टिमॅटिकली इंपॉर्टंट एनबीएफसी - एनडी, मार्च ३१, २००९ अखेरीस संपलेल्या वर्षापासून त्यांच्या ताळेबंदात पुढील संबंधात अतिरिक्त प्रकटीकरण करतील :

कॅपिटल टु रिस्क ॲसेट रेशो (सीआरएआर)
रियल इस्टेट क्षेत्राला प्रत्यक्ष तसेच अप्रत्यक्ष असलेले एक्सपोझर आणि
ॲसेट्स व लायाबिलिटीजचा परिपक्वता साचा

[४] (अधिक माहिती डीएनबीएस.पीडी/सीसी.क्र.९३/०३.०५.००२/२००६-९७ दि एप्रिल २७, २००७ मध्ये दिली आहे.)
[५] (अधिसूचना क्र डीएनबीएस.२००/सीजीएम(पीके)-२००८ दि ऑगस्ट १,२००८)
[६] परिपत्रक पीडी/सीसी क्र. १३८/०३.०२.००२/२००८-०९ दि.एप्रिल २४, २००९ अन्वये बदल करण्यात आला.

ही अतिरिक्त माहिती प्रकटकरण्याबाबतचा नमुना कंपनी परिपत्रक डीएनबीएस (पीडी).सीसी.क्र. १२५/०३.०५.००२/२००८-०९ दि. ऑगस्ट १, २००८ मध्ये दिलेला आहे.

### ४. ॲसेट लायाबिलिटी मॅनेजमेंट (ए एल एम) - अहवाल पाठविणे

एनबीएएफसी - एनडी - एसआय ह्यांनी, एएलएम १, एएलएम २ आणि एएलएम ३ असे तीन रिपोर्ट्स सादर करावयाचे असतात, शॉर्ट टर्म डायनॅमिक लिक्विडिटीबाबतचे विवरणपत्र (एनबीएस - एएलएम १)हे दरमहा द्यावे लागते आणि स्ट्रक्चरल लिक्विडिटीचे विवरणपत्र (एनबीएस - एएलएम २) दर सहा महिन्यांनी द्यावे लागते. इंटरेस्ट रेट सेन्सिव्हिटीचे विवरणपत्र (एनबीएस - एएलएम ३) देखील दर सहा महिन्यांनी द्यावे लागते. ह्या बँकेने एएलएम रिटर्नबाबतचा (१, २ व ३) नमुना बँकेच्या वेबसाईटवर (https://cosmos.rbi.org.in) टाकला आहे.

### ५. कॅपिटल ॲडेक्वसीसाठी भांडवल वाढविण्याबाबतच्या पर्यायाचा विस्तार

धंदा वाढविण्यासाठी व विनियामक आवश्यकता पूर्ण करण्यासाठी निधी वाढविण्याची आवश्यकता विचारात घेता, सिस्टिमॅटिकली इंपोर्टंट अबँकीय व ठेवी न स्वीकारणाऱ्या वित्तीय कंपन्या (एनबीएफसी -एनडी - एसआय), त्यांचा भांडवली निधी वाढविण्यासाठी ह्या परिपत्रकातील मार्गदर्शक तत्वांनुसार परपेच्युअल कर्ज संलेख (पीडीआय) देऊ शकतात असे ठरविण्यात आले आहे. असे पीडीआय, मागील लेखा वर्षाच्या ३१ मार्च रोजी असलेल्या एकूण टियर १ भांडवलाच्या १५% पर्यंत टियर १ भांडवलात समाविष्ट केले जाण्यास पात्र असतील.

(अधिक माहिती डीएनबीएस (पीडी).सीसी.क्र. १३१/०३.०५.००२/२००८-०९ दिं. ऑक्टोंबर २९, २००८ मध्ये दिली आहे.)

### ६. एनबीएफसींचे रेटिंग

एनबीएफसींद्वारे, ज्यांना रेटिंग एजन्सीजकडून रेटिंग दिले जाते असे कमर्शियल पेपर्स, डिबेंचर्स इत्यादि प्रकारचे वित्तीय उत्पाद दिले जात असतात. अशा उत्पादांना दिल्या जाणाऱ्या रेटिंगमध्ये, त्या रेटिंग एजन्सीजद्वारे काही कारणास्तव होण्याची शक्यता असते. त्यामुळे ठरविण्यात आले आहे की, रु १०० कोटी किंवा त्यापेक्षा अधिक ॲसेट साईस असलेल्या सर्व एनबीएफसींनी (ठेवी घेणाऱ्या व न घेणाऱ्या) त्यांनी दिलेल्या कोणत्याही वित्तीय उत्पादांना दिल्या गेलेल्या रेटिंगमधील वाढ/घट, असा बदल झाल्याच्या १५ दिवसांच्या आत, त्यांचे पंजीकृत कार्यालय ह्या बँकेच्या ज्या प्रादेशिक कार्यालयाच्या अधिकारक्षेत्राखाली येते त्या कार्यालयाला कळवावी.

### ७. एनबीएफसी - एनडी - एसआय दर्जा ठरविण्यासाठी मापदंड

ताळेबंदाच्या दिवशी रु १०० कोटी ॲसेट साईस असलेली, ठेवी न घेणारी एनबीएफसी, उद्योगधंदा वाढविण्याची योजना ह्यासह इतर अनेक कारणांनी, पुढील ताळेबंदाच्या तारखेपूर्वी ॲसेट्समध्ये भर घालू शकते. येथे स्पष्ट करण्यात येते की, एखाद्या एनबीएफसीचा ॲसेट साईस रु १०० कोटी किंवा त्यापेक्षा अधिक झाल्यावर, तिच्या शेवटच्या ताळेबंदाच्या तारखेस असे ॲसेट्स नसले तरीही, ती एनबीएफसी, वर सांगितल्याप्रमाणे, एनबीएफसी - एनडी - एसआयसाठी असलेल्या विनियामक आवश्यकतांखाली येईल. ह्यासाठी सांगण्यात येते की, अशा, ठेवी न घेणाऱ्या एनबीएफसींनी, त्यांचा ॲसेट साईस रु १०० कोटी कोणत्याही तारखेस झाला असला तरीही, आरबीआयने, एनबीएफसी - एनडी - एसआयसाठी वेळोवेळी दिलेल्या विनियमांचे पालन करावे.

असेही दिसून आले आहे की, गतिशील परिस्थितीत, एखाद्या दिलेल्या महिन्यात एखाद्या कंपनीचा ॲसेट साईस रु १०० कोटींच्या ही खाली जाऊ शकतो व तो तात्पुरता कमी जास्त होण्यामुळे झालेले असते परंतु प्रत्यक्ष घट झाल्यामुळे नव्हे. येथे स्पष्ट करण्यात येते की अशा बाबतीत, त्या कंपनीने महत्वाच्या वित्तीय बाबींवरील मासिक अहवाल रिझर्व बँकेकडे पाठविणे सुरुच ठेवावे आणि रिझर्व बँकेला ऑडिट केलेला पुढील ताळेबंद सादर करेपर्यंत अशा बाबतीत रिझर्व बँकेकडून विशेष निदेश येईपर्यंत विद्यमान निदेशांचे पालन करावे.

(अधिक माहिती डीएनबीएस (पीडी).सीसी.क्र. १४१ /०३.१०.००१/२००८-०९ दि. जून ४, २००९ )

**कॉर्पोरेट डेट सिक्युरिटीजमध्ये रेडी फॉरवर्ड कॉंट्रॅक्ट्स**

आरबीआयच्या इंटर्नल डेट मॅनेजमेंट डिपार्टमेंटने (आयडीएमडी) दिलेल्या 'रेपो इन कॉर्पोरेट डेट सिक्युरिटीज (रिझर्व बँक) निदेश, २०१०', दि जानेवारी ८, २०१० अन्वये, आरबीआयकडे पंजीकृत झालेल्या एनबीएफसी (कंपनीज अधिनियम १९५६ च्या कलम ६१७ खाली व्याख्या केलेल्या सरकारी कंपन्या सोडून) कॉर्पोरेट डेट सिक्युरिटीजच्या रेपो व्यवहारात भाग घेण्यास पात्र आहेत. आयडीएमडीने, मार्च २३, २०१० रोजी, रेपो/रिव्हर्स रेपो व्यवहारांसाठी एकसमान जमाखर्चावरील सुधारित मार्गदर्शक तत्वे दिली आहेत.

२. अशा रेपो व्यवहारात भाग घेणाऱ्या एनबीएफसींनी आयडीएमडीने दिलेले निदेश व अकाउंटिंगबाबतच्या मार्गदर्शक तत्वांचे पालन करणे आवश्यक आहे.

**अर्हताप्राप्त सहभागी**

१) रु १०० कोटी व त्यापेक्षा अधिक ॲसेट साईस असलेल्या एनबीएफसी - एनडी (म्हणजे एनबीएफसी - एनडी - एसआय)

**कॅपिटल ॲडेक्वसी**

२) अशा व्यवहारांसाठी तारण असलेल्या कर्ज जोखमींसाठीचे जोखीमभार तसेच प्रतिपक्षाच्या कर्ज जोखमींसाठीचे जोखीम-भार, वेळोवेळी सुधारित केलेल्या, एनबीएफसी (ठेवी न स्वीकारणाऱ्या व धारण न करणाऱ्या) प्रुडेंशियल नॉर्म्स निदेश, २००७ मधील देणाऱ्या/प्रतिपक्षाला लागु होणारे असतील.

**खात्यांमधील शिल्लकेचे वर्गीकरण**

४) निरनिराळ्या खात्यांमधील उदा. रेपो अकाउंट, रिव्हर्स रेपो अकाउंट इत्यादि शिल्लकांचे वर्गीकरण बँकांप्रमाणेच संबंधित शेड्युलमध्ये केले जाईल.

३. अशा रेपो व्यवहारांशी संबंधित इतर बाबतीत, एनबीएफसी - एनडी - एसआय आयडीएमडीने दिलेले निदेश व लेखासंबंधीच्या मार्गदर्शक तत्वांचे (उदा रेपो इन कॉर्पोरेट डेट सिक्युरिटीज (रिझर्व बँक) निदेश, २०१०, दि. जानेवारी ८, २०१० चे आणि युनिफॉर्म अकाउंटिंग फॉर रेपो/रिव्हर्स रेपो ट्रॅन्झॅक्शन्स दि. मार्च २३, २०१० चे अनुक्रमे पालन करतील.

( डीएनबीएस (पीडी).सीसी.क्र. १९६ / ०३.०५.००२ /२०१०-११ दि. ऑगस्ट ११, २०१०)

**चलन पर्यायांमध्ये (करंसी ऑप्शन्स) सहभाग**

जुलै ३०, २०१० रोजी, रिझर्व बँकेने, मान्यताप्राप्त स्टॉक/नवीन एक्सचेंजेसमधील करन्सी ऑप्शन्समध्ये ट्रेडिंग करण्याबाबतची मार्गदर्शक तत्वे बँकांना दिली होती.

२) त्यानुसार, असे ठरविण्यात आले आहे की, सेबीने ग्राहक (क्लायंट) म्हणून मान्यता दिलेल्या डेसिग्नेटेड करन्सी ऑप्शन्स एक्सचेंजेसमध्ये एनबीएफसी भाग घेऊ शकतात - मात्र त्यासाठी आरबीआयने (विदेशी मुद्रा विभाग) ह्याबाबत दिलेल्या मार्गदर्शक तत्वांचे, केवळ त्यांच्या अंडरलायिंग फोरेक्स जोखमीचे हेजिंग करण्यासाठी, अनुपालन केले असले पाहिजे, ह्यासंबंधाने केलेल्या व्यवहारांबाबत ताळेबंदात सुयोग्य प्रकटीकरण केले जावे.

( डीएनबीएस (पीडी).सीसी.क्र.१९९/०३.१०.००१/२०१०-११ दि.सप्टेंबर १६, २०१०)

परिशिष्ट

## परिपत्रकाची यादी

| अनु. क्र. | परिपत्रक क्र. | दिनांक |
|---|---|---|
| १. | डीएनबीएस (पीडी) सी.सी क्र. ४५/ ०२.०२/ २००४-०५ | नोव्हें बर १३, २००४ |
| २. | डीएनबीएस (आरआयडी) सी.सी.क्र. ५७/०२.०५.१५/२००५-०६ | सप्टेंबर ६ , २००५ |
| ३. | डीएनबीएस (सीएमडीआय) सी.सी क्र.६७/२१.०५.१५/२००५-०६ | एप्रिल ५, २००६ |
| ४. | डीएनबीएस (सीएमडीआय) सी.सी क्र.६९/२१.०५.१५/२००५-०६ | जुन २, २००६ |
| ५. | डीएनबीएस.पीडी/सीसी. क्र. ८६/ ०३.०२.०८९ /२००६-०७ | डिसेंबर १२, २००६ |
| ६. | डीएनबीएस (पीडी)सीसी. क्र.९०/ ०३.१०.००१/ २००६-०७ | फेब्रुवारी २३, २००७ |
| ७. | डीएनबीएस.पीडी/सीसी. क्र. ९३ / ०३.०५.००२ /२००६-०७ | एप्रिल २७, २००७ |
| ८. | डीएनबीएस (पीडी).सीसी. क्र. १२५/०३.०५.००२/२००८-२००९ | ऑगस्ट १, २००८ |
| ९. | डीएनबीएस (पीडी).सीसी.१३१ / ०३.०५.००२/२००८-०९ | ऑक्टोबर २९, २००८ |
| १०. | डीएनबीएस. पीडी.सीसी . क्र. /१३२/२२.१०.७२/ २००८-०९ | डिसेंबर २३, २००८ |
| ११. | डीएनबीएस.(पीडी)सीसी.क्र.१३४/०३.१०.००१/ २००८-२००९ | फेब्रुवारी ०४, २००९ |
| १२. | एीएनबीएस (पीएी)सीसी.क्र.१३६/०३.१०.००१/२००८-०९ | फेब्रुवारी १८, २००९ |
| १३. | एीएनबीएस.पीएी/सीसी. क्र.१३८/०३.०२.००२/२००८-०९ | एप्रिल २४ ,२००९ |
| १४. | डीएनबीएस (पीडी)सीसी.क्र.१४१/०३.१०.००१/२००८-०९ | जुन ४, २००९ |
| १५. | डीएनबीएस.पीडी.सीसी. क्र.१६९ /२२.०५.०२/२००९-१० | एप्रिल २२, २०१० |
| १६. | डीएनबीएस.पीडी/सीसी.क्र.१९६/०३.०५.००२ /२०१०-११ | ऑगस्ट ११, २०१० |
| १७. | डीएनबीएस (पीडी)सीसी क्र.१९९/०३.१०.००१/२०१०-११ | सप्टेंबर १६, २०१० |